# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

Special Issue

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


**Volume-II, February 2019 (Special Issue)**


ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission


EDITOR IN CHIEF

DR. M. RAGHIB DESHMUKH

GUEST EDITOR

DR. BALASAHEB JADHAV



www.scholarsimpact.com


: Organised by :

**Department of Political Science**

M.S.P. Mandal's

**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)

(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

| | | |
|---|---|---|
| 21. | भारतीय लोकशाहीमध्ये नीती आयोगाची भूमिका<br>प्रा. डॉ. गुडे दुर्गादेवी तुकाराम | 75 – 77 |
| 22. | भारतीय लोकशाही आणि प्रांतवाद<br>घन आनंद लक्ष्मीकांत | 78 – 81 |
| 23. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. डि. आर. भागवत, प्रा. डॉ. शकुंतला देवराव जवंजाळ | 82 – 85 |
| 24. | भ्रष्टाचार ही लोकशाही पुढील आव्हान ! एक अध्ययन<br>प्रा. डॉ. डी. के. कदम | 86 – 88 |
| 25. | अन्यथा भारताची लोकशाही संकटात सापडेल<br>प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 89 – 91 |
| 26. | भारतीय लोकशाही आणि सुशासन<br>प्रा. धर्मराज केशवराव कटके | 92 – 94 |
| 27. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मतदानाच्या हक्काबाबत विचार<br>प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे | 95 – 98 |
| 28. | लोकशाहीवर दहशतवादाचा होणारा परिणाम<br>प्रा. शेंडगे वैभव | 99 – 101 |
| 29. | भारतीय लोकशाहीचे वास्तव व स्वरूप<br>प्रा. डॉ. गणेश गोविंदराव माने | 102-104 |
| 30. | दहशतवाद भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान<br>प्रा. के. एम. नागरगोजे | 105-106 |

(23)

# भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग (विशेष संदर्भ स्थानिक स्वराज्य संस्था)

प्रा.डॉ.शकुंतला देवराव जवंजाळ
सहाय्यक प्राध्यापक
श्री शिवाजी विधी महाविद्यालय,परभणी.

प्रा.डॉ.डि.आर.भागवत
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कै.सौ.कमलताई जामकर महिला
महाविद्यालय, परभणी.

जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा जगातील एक मोठे लोकशाही प्रधान राष्ट्र अशी निर्माण झाली... अमेरिका, इंग्लंड,फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड इत्यादी प्रगत राष्ट्रात लोकशाही शासन व्यवस्था निर्माण केल्या... तेथील जनतेला प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द लढा द्यावा लागला. भारताने 15 ऑगस्ट 1947 नंतर जरी लोक... व्यवस्था स्विकारली असली, तरी ब्रिटीश राजवटीत भारतीय जनतेला लोकशाहीची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष या ... पध्दतीने ओळख झाली होती.

लोकशाही हा शासनाचा प्रकार आणि भारतीयांचे राजकीय वैचारिक प्रबोधन ही प्रक्रिया ब्रिटिशांच्या ... आगमनानंतर सुरू झाली असे म्हणण्यास देखील पुश्कळ वाव आहे. निवडणूकीच्या माध्यमातून आपला प्रति... निवडून देणे व त्यांच्यामार्फत राजकीय प्रकियेत सहभाग नोंदविणे ही आजच्या प्रातिनिधीक किंवा अप्र... लोकशाहीची पध्दत जगातील जवळपास सर्व राष्ट्रांनी स्वीकृत केली आहे.

राजकीय सहभाग :– अर्थ

लोकशाहीत लोकांचा राजकीय सहभाग मोठया प्रमाणात अपेक्षित असतो. राजकीय सहभाग ही संकल्प... अतिशय व्यापक आहे. "राजकीय सहभाग याचा अर्थ केवळ मतदान करणे इतपत मर्यादित नव्हे तर निवडणूकी... प्रत्यक्ष सहभागी होणे, राजकीय पद ग्रहण करणे, निर्णय प्रकियेत सहभागी होणे,राजकीयदृष्टया सक्रिय राहणे आ... राजकीय सजगता इत्यादी बाबींचा यात समावेश होतो."[1] भारतीय लोकशाहीचे चित्र रंगवतांना मात्र येथील बहुसं... लोकांचा राजकारणातील सहभाग केवळ मतदान करणे इतपत मर्यादित दिसतो. निवडणूकीत उमेदवारास मतदा... केले म्हणजे आपले राजकीय व राष्ट्रीय कर्तव्य बजावले असा त्याचा अर्थ होत नाही, तर निवडून दिलेले उमेदवा... आपले कर्तव्य व अधिकार योग्य पध्दतीने पार पाडत आहेत किंवा नाही हे पाहणे, निवडून दिलेला प्रतिनिधी योग्य... क्षमतेचा आहे किंवा नाही याचे सतत परिक्षण करणे हे देखील यात अपेक्षित आहे. ही लोकशाही शासनव्यवस्थेतील... लोकांची प्राथमिक राजकीय कर्तव्य आहेत. त्यामुळे लोकशाहीत शासनाची गुणवत्ता ही लोकांच्या गुणवत्तेवर... अवलंबुन असते. कारण शासनाची निवड लोकांमार्फत होत असते.

लोकशाही शासनव्यवस्था ज्या तीन तत्वांवर चालते, ती तत्वे म्हणजे स्वातंत्र, समता आणि बंधुता ही हो... लोकांना राजकीय स्वातंत्र देणे व सामाजिक न्यायावर आधारित समता प्रस्तापित करणे हे लोकशाहीचे मुलभूत त... आहे. त्याचप्रमाणे समाजातील विविध घटक व प्रवर्गातील विशेशतः सामाजिक दृष्टया, वंचित, मागा... लोकांना समान हक्क व स्वातंत्राचा पुरस्कार प्रस्तुत व्यवस्था करते. भारतीय राज्यघटनेने ही त्रिसुत्री घटनेच्या... निर्मितीपासूनच स्वीकृत केली आहे. राज्यघटनेतील सर्व मुलभूत अधिकार, स्वातंत्रे सर्व नागरिकांना धर्म, जात, वं... लिंग, पंथ, प्रदेश, भाशा असा कोणताही भेदभाव न करता समान प्रदान केली आहेत. यास राजकीय अधिकार... अपवाद नाहीत.

राज्यघटनेतील तत्वे आणि वास्तव परिस्थिती यांची तुलना केली असता, प्रत्यक्षात याबाबत अंतर पाहावयास... मिळते. भारतात राजकीय सत्ता ही फिरती न राहता विशिष्ट अशा अभिजन वर्गाच्या हातात राहिलेली आ... भारतीय समाजरचनेत जातिव्यवस्थेच्या उतरंडीत तळागाळातील लोक अजुनही राजकीय सत्तेपासून हजारो मैल दु... आहेत. तसेच भारतीय राजकीय व्यवस्थेत लिंगाधारित विशमता देखील मोठया प्रमाणात दिसून येते. भारतीय... स्त्री–पुरुश यांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण यात फार मोठी दरी अजुनही आहे.

प्रस्तुत शोधनिबंधातून भारतातील महिलांचा राजकारणातील सहभाग यावर प्रकाश टाकला आहे. 'भारताचा नागरिक' म्हणून भारतीय महिलांचा राजकीय सहभाग कसा आणि किती प्रमाणात राहीला आहे ? महिलांचे लोकसंख्येतील प्रमाण व राजकीय सहभाग यांची तुलना देखील यातून अप्रत्यक्षपणे केली आहे. भारतीय लोकशाहीत महिलांच्या अल्प सहभागाची कारणे काय आहेत ? स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण मिळाले, परंतु त्या प्रभावीपणे आपल्या अधिकारांचा वापर करण्यावर मात्र मर्यादा येतात. तेव्हा या स्तरावरील महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी आणि त्यांनी आपल्या भुमिका प्रभावीपणे पार पाडण्यासाठी काही उपाय या शोधनिबंधात सुचविले आहेत.

भारतीय महिलांचा राजकीय सहभाग –

भारतात स्वातंत्रपूर्व काळात स्वातंत्र लढयात महिलाही पुरूशांच्या बरोबरीने मोठया संख्येने सहभागी होत्या. सन 1885 साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून भारतात राजकीय वैचारिक प्रबोधनाला सुरूवात झाली. ''मवाळांच्या राजकीय चळवळीपासुन ते अगदी जहाल आणि सशस्त्र स्वातंत्र चळवळीमध्येही महिलांचा सहभाग राहिला आहे.''[2] डॉ.ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू, कमला नेहरू, हंसा मेहता, अरूणा असफ अली, प्रितीलता वडेदार, राजपती कौल कस्तुरबा गांधी इत्यादी नावांची यादी मोठी आहे. ''महिलांचा स्वातंत्र लढयातील आणि राजकीय चळवळीतील सहभाग वाढविण्याचे श्रेय माहात्मा गांधी यांच्या नेतृत्वाला जाते.''[3] ''गांधीजीचे अहिंसा, सविनय कायदेभंग व सत्यागृहाचे तत्व अगदी महिलांनाही अवलंबिता येणारे होते. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांविरूध्द सुरू केलेला मीठाचा सत्याग्रह, असहकार चळवळ, भारत छोडो आंदोलन या माध्यमातून त्यांनी महिलांना मोठया संख्येने सहभागाची संधी उपलब्ध करून दिली.''[4]

स्वातंत्रानंतर भारतीय राजकारणातील महिलांच्या सहभागाचे चित्र पाहता ते फारसे आशादायी दिसुन येत नाही. माहात्मा गांधीनंतर महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देणारे सर्वमान्य नेतृत्व देखील राजकारणात निर्माण झाले नाही. महिलांच्या राष्ट्रीय स्तरावरील अल्प राजकीय सहभागाची स्पष्ट कल्पना यावी यासाठी पुढील तक्ता दिला आहे. यातील आकडेवारीवरून ही बाब अधिक ठळकपणे स्पष्ट होण्यास मदत होते.

लोकसभेतील महिला प्रतिनिधींची संख्या दर्शविणारा तक्ता [5]

| अ.क्र. | निवडणूक व वर्श | एकूण प्रतिनिधींची संख्या | महिला प्रतिनिधिंची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | पहिली निवडणूक 1952 | 499 | 22 | 4.4 |
| 2 | दुसरी निवडणूक 1957 | 500 | 27 | 5.4 |
| 3 | तिसरी निवडणूक 1962 | 503 | 34 | 6.7 |
| 4 | चौथी निवडणूक 1967 | 523 | 31 | 5.9 |
| 5 | पाचवी निवडणूक 1971 | 521 | 22 | 4.2 |
| 6 | सहावी निवडणूक 1977 | 544 | 19 | 3.4 |
| 7 | सातवी निवडणूक 1980 | 544 | 28 | 5.1 |
| 8 | आठवी निवडणूक 1984 | 544 | 44 | 8.1 |
| 9 | नववी निवडणूक 1989 | 529 | 28 | 5.29 |
| 10 | दहावी निवडणूक 1991 | 514 | 39 | 7.07 |
| 11 | अकरावी निवडणूक 1996 | 544 | 35 | 6.04 |
| 12 | बारावी निवडणूक 1998 | 543 | 43 | 7.0 |
| 13 | तेरावी निवडणूक 1999 | 543 | 49 | 9.02 |
| 14 | चौदावी निवडणूक 2004 | 543 | 45 | 8.29 |
| 15 | पंधरावी निवडणूक 2009 | 543 | 59 | 10.87 |
| 16 | सोळावी निवडणूक 2014 | 543 | 66 | 12.15 |

उपरोक्त तक्ता आणि यातील आकडेवारी महिलांचा भारतीय राजकारणातील सहभाग किती अल्प प्रमाणात राहिला आहे याचे विवेचन करतो. 2011 साली झालेल्या जणगणनेनुसार महिलांची संख्या एकूण लोकसंख्येच्या 48 18 टक्के आहे.[6] परंतू त्यांचे लोकसभा या सभागृहातील मागील सोळाव्या लोकसभे पर्यंत कमाल प्रमाण केवळ 12.15 टक्के एवढे अल्प राहिले आहे.

महिलांच्या या अल्प राजकीय सहभागातील कारणांची मीमांसा करतांना यास अनेक घटक जबाबदार असल्याचे दिसून येते.

''भारतीय समाजाने अजुनही महिलांचे राजकीय नेतृत्व मनापासून स्विकारलेले दिसून येत नाही. महिलांच्या राजकीय भूमिकेबाबत पुरूशप्रधान समाज साशंक आहे. महिला देखील आपल्या राजकीय सहभागा बाबत फारशा उत्सुक नाहीत असेही यामागील एक कारण दिसून येते.''[7]

वास्तविक लोकशाही तत्वानुसार सामान्य लोकांमधून राजकीय नेतृत्व निर्माण होण्यासारखी परिस्थिती भारतीय राजकारणात आढळून येत नाही. लोकशाही प्रधान राजकीय व्यवस्था असलेल्या या देशात राजकारणात मात्र घराणेशाही व पुरूश प्रधानता अधिक राहिली आहे. ज्या देशाचे पंतप्रधान पद एका महिलेने 15 वर्ष भूशविले, त्या देशात सामान्य महिलांचा राजकीय सहभाग मात्र मतदानाच्या अधिकारा इतपत सिमित राहिला आहे.

महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी त्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थामधील सहभाग वाढावा यासाठी केंद्रशासनाने क्रांतीकारक 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती केली, ज्याद्वारे त्यांना या संस्थामधून 33 टक्के आरक्षणाची तरतूद केली गेली आहे. ''या घटनादुरूस्तीच्या माध्यमातून स्थानिक राजकारणातून महिला नेतृत्व निर्माण करणे त्यांना राजकीय पदे ग्रहण करता यावीत व याद्वारे या संस्थामधील कार्यसंपादणूकीतून त्यांचा निर्णय व धोरण प्रक्रियेतील सहभाग वाढावा हा उदेश आहे. यातून पुढे राष्ट्रीय व राज्य पातळीवर नेतृत्व पुढे यावे असे अपेक्षित आहे.''[8] ''महिलांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाला 25 वर्ष पूर्ण झाली आहेत. या संस्थामधील महिला आरक्षणाचे शासकीय व निमशासकीय या दोन्ही स्तरावर सर्वेक्षण केले गेले. यात या स्तरातुन देखील महिला नेतृत्व पुढे येण्यास अनेक मर्यादा या स्त्रियांवर येत असल्याचे नमुद केले आहे. तसेच पुरूश प्रधान मानसिकता महिलांना त्यांचे अधिकार वापरण्यावर मर्यादा आणते. अनेक ठिकाणी महिला सरपंच अनिच्छेने केवळ कुटुंबातील पुरूशांची इच्छा किंवा दबाव यामुळे पदावर बसलेल्या आहेत. असेही यात नमुद केले आहे.''[9]

निश्चित उपरोक्त घटनादुरूस्तीमुळे महिलांना राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभागी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. काही महिला नेतृत्व धडाडीने काम करत असल्याची उदाहरणेही पुढे येत आहेत. परंतू अजुनही महिलांचा या संस्थामधील सहभाग वाढण्यासाठी काही उपाय योजना करणे आवश्यक ठरते.

स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांचा राजकीय सहभाग वाढावा तसेच कार्यरत महिलांनी अधिक सक्षमपणे आपले अधिकार वापरावे यासाठी काही उपाय सुचविलेले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधून महिला प्रतिनिधींनी प्रभावीपणे भूमिका पार पाडण्यासाठी सुचविलेले उपाय :–

1. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय पदावर कार्यरत महिलांना राजकीय प्रशिक्षणाची सोय राज्यशासनांनी करावी. उदा. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेले 'पंचायत महिला शक्ती अभियान' हे याबाबत आदर्श उदाहरण म्हणून देता येईल.
2. राजकीय सहभाग ज्यात कार्यसंपादणूक निर्णय प्रक्रिया अधिकाराचा व सत्तेचा वापर सजगपणे करता यावा यासाठी शैक्षणिक पात्रतेची अट आवश्यक करावी.
3. महिलांचा सर्व स्तरावरील राजकीय सहभाग वाढण्यासाठी व त्यांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी महिलांनी स्वत: पुढाकार घेवून राजकीय संघटना निर्माण करण्याची आवश्यकता आहे.
4. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राजकीय पदावर कार्यरत महिलांनी जागृत राहून आपले अधिकार स्वतः वापरण्यास शिकणे आवश्यक आहे.

समारोप :—

भारतीय लोकशाही आणि त्यातील महिलांचा राजकीय सहभाग वर्तमानकाळात फारसा उत्साहवर्धक नसला तरी भारतीय समाजमन, महिलांचे स्वप्रयत्न,शासनाचे धोरणे, कायदे आणि महिलांच्या राजकीय सहभागाच्या सकारात्मक दृष्टीकोनातून हा सहभाग वाढवता येणे शक्य आहे. आरक्षण हा कायमस्वरूपी उपाय असुच शकत नाही. तो केवळ वंचित वर्गामध्ये आपल्या अधिकारांचा उपयोग करण्याची क्षमता निर्माण करण्याचा एक मार्ग आहे.

तेव्हा महिलांनी स्वतः राजकीय वर्तुळात आपले स्थान निर्माण करण्याची गरज आहे. इतर क्षेत्राप्रमाणे राजकीय क्षेत्र देखील याला अपवाद न राहता भविश्यात भारतीय लोकशाही व्यवस्थेचे चित्र देखील स्त्री—पुरूश यांच्या समान सहभागावर आधारित दिसेल. ती खरी समताधारित लोकशाही व्यवस्था ठरेल.

संदर्भ :

1. Saxena K.S. – Women"s Political participation in India (1999), Sublime Publication Jaipur pg. no.71
2. Pruthvi Rajkumar, Rameshwari Devi & Romila Pruthi- Encyclopedia of status and Empowerment of women in India (vol.3), Mangal Deep Publication Jaipur pg.no.09
3. Mahan Rajan- Women in Indian National Congress (1999) Rawat Publication New Delhi & Jaipur pg.312
4. Mahan Rajan- उपरोक्त
5. https://eci.gov.in
6. www.censusindia.gov.in /2011/census / population-enumeration.html
7. Pruthvi Rajkumar, Rameshwari Devi & Romila Pruthi- उपरोक्त pg.no.17
8. Batra Manjula – Women & Law (2003) – Allahbad Law Agency, Farijabad pg.43
9. दैनिक लोकसत्ता (चतुरंग पुरवणी) महिला आरक्षण सत्तेच्या सोंगटया —दि.06 जानेवारी 2018 लेखिका सुवर्णा दामले पृश्ठ क.1

इतर संदर्भ ग्रंथ

10. Handbook an women & Human Rights Fatima E.Siddiqui & Sarala Rangnathan – Kanishka Publication – New Delhi (Vol.1&2)
11. डॉ.तिवारी आर.पी.एवं डॉ.शुक्ला डी.पी. भारतीय नारी वर्तमान समस्यांचे और भावी समाधान 1999 एपीएच पब्लिकेशन को—ऑपरेशन नई दिल्ली.